# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१-२७२०११६, विस्तार क्र.२२५ proumc321@gmail.com


दिनांक : ०१/१२/२०२३

# प्रेसनोट

**माझी वसुंधरा अभियान अंतर्गत महापालिका मुख्यालयात ऊर्जा बचत करणा-या विजेच्या उत्पादनांचे प्रदर्शन**

माझी वसुंधरा अभियान अंतर्गत निसर्गातील भुमी, वायु, जल, अग्नि व आकाश या पाच घटकांपैकी अग्नि या घटकांतर्गत ऊर्जेची बचत व ऊर्जेचे संवर्धन करण्याबाबत उल्हासनगर शहरातील नागरीकांमध्ये जनजागृती करणेच्या दृष्टीने मा. आयुक्त अजीज शेख, अति. आयुक्त, जमीर लेंगरेकर तसेच उपायुक्त डॉ. सुभाष जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. हनुमंत खरात, कार्यकारी अभियंता तसेच सौ. विशाखा सावंत, पर्यावरण विभागप्रमुख यांच्या समन्वयाने दिनांक ३०/११/२०२३ रोजी उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालयातील महासभा सभागृहामध्ये ऊर्जा बचत करणा-या विजेच्या उत्पादनांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते.

ऊर्जा बचतीमुळे पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत होणार आहे. आपल्या दैनंदिन जीवनामध्ये आपण नियमित वेगवेगळया कारणाने विजेचा वापर करत असतो तर आधुनिक उत्पादनांचा वापर केल्यास कशाप्रकारे ऊर्जेची बचत होईल याबाबत नागरीकांमध्ये जाणीव होणे आवश्यक आहे असे मा. आयुक्त अजीज शेख यांनी उपस्थितांना सांगितले.

ऊर्जेच्या उत्पादनासाठी पाणी तसेच कोळसा याचा वापर करावा लागतो. कोळसा निर्मितीसाठी झाडांची छाटणी केली जाते त्यामुळे ऊर्जा बचत करणारी उत्पादने वापरल्यास पर्यावरणाची हानी टाळण्यास मदत होणार आहे. त्या अनुषंगाने उल्हासनगर शहरातील नागरीकांना या बाबत माहिती मिळावी तसेच नागरीक जागृत व्हावेत या करीता आजचे LED विज उपकरणांचे प्रदर्शन भरवण्यात आले व नागरीकांमध्ये त्याद्वारे जनजागृती करुन जास्तीत जास्त LED विज उपकरणांचा वापर करुन विज बचत करण्याविषयी आवाहन करण्यात आले.

सदर प्रदर्शनामध्ये कॉम्पटन ग्रीव्हज, पॉलीकॅब, चतुर लाईटस अशा सुमारे १४ कंपन्यांनी विजेची उत्पादने प्रदर्शित केली होती. सदर प्रदर्शनामध्ये मोठया संख्येने उल्हासनगर शहरातील माजी नगरसेवक, शाळांचे शिक्षक वर्ग, आयटीआयचे विद्यार्थी, महाविद्यालयातील विद्यार्थी, महापालिकेचे अधिकारी/कर्मचारी तसेच काही अशासकिय संस्था व त्यांचे प्रतिनीधी यांनी भेट दिली आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे आयोजित ऊर्जा बचत करणा-या विजेच्या उत्पादनांचे प्रदर्शनास मा. आमदार, श्री. गणपत गायकवाड यांनी देखील भेट दिली.

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.